# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 November 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा निवडणूक जाहीरनामा थोड्या वेळापुर्वीच मुंबई इथं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी प्रसिद्ध केला. यावेळी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित होते. दरम्यान, भारतीय जनता पक्षाचा जाहिरनामा आज सकाळी मुंबईत प्रसिद्ध झाला. याप्रसंगी पक्षाचे ज्येष्ठ नेते –केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्यातले नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंसह पक्षाचे केंद्रीय तथा राज्यातील मंत्री–नेते मंडळी उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर अमित शहा यांची आज जळगाव, बुलडाणा आणि अमरावती याठिकाणी प्रचारसभा होत आहे.

****

केंद्र सरकारनं, चालू खरीप हंगामात प्राप्त ताज्या आकडेवारीनुसार, १२० लाख मेट्रीक टन भाताची खरेदी केली आहे. त्यामुळे साडेसहा लाखांहून अधिक शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीद्वारे आर्थिक लाभ झाला आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारनं येत्या महिनाअखेरीपर्यंत यंदाच्या खरीप विपणन हंगामात १८५ लाख मेट्रीक टन भातखरेदीचं उद्दीष्ट्य निश्चित केलं आहे.

****

शिक्षणात गुंतवणूक हा समाजसेवेचा सर्वात प्रभावी मार्ग आहे, उच्चशिक्षित झाल्यानं मनुष्यबळ समृद्ध होऊन वर्तमान आणि भविष्य दोन्ही सुरक्षित राहतं, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. ते काल राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या चौथ्या दीक्षांत समारंभात बोलत होते. शिक्षणाकडे व्यापार म्हणून पाहू नये तर शिक्षणासाठी योगदान देणं आपलं कर्तव्य असल्याचं त्यांनी सांगितलं. जगात अनेक अग्रगण्य

शिक्षणसंस्था त्यांच्या माजी विद्यार्थ्यांच्या शाश्वत पाठिंब्यावर आणि उत्साहाच्या बळावर भरभराट करताना दिसत आहेत असं त्यांनी म्हटलं आहे.

****

येत्या परवा १२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपूर इथल्या विठ्ठल मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर समितीचं प्रवेशद्वार, मंदिराचं शिखर, सात मजली दर्शन मंडप आदी ठिकाणी रंगीबेरंगी ही रोषणाई करण्यात आली आहे. विद्युत रोषणाईमुळे मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशानं उजळून निघाला आहे. कार्तिकी एकादशीच्या वारीसाठी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक अशा विविध राज्यातून शेकडोंच्या संख्येने दिंड्या आणि पालख्या पंढरीत दाखल होत असतात.

****

गोवा इथं आयोजित होणाऱ्या पंचावन्नाव्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव – इफ्फीच्या अनुषंगानं इफिएस्टा उपक्रम राबवला जाणार आहे. गोव्यातल्या पणजीच्या कला अकादमीत येत्या २१ ते २८ नोव्हेंबर दरम्यान, इफिएस्टाचं आयोजन करण्यात आल्याचं सुचना आणि प्रसारण मंत्रालयानं कळवलं आहे.
भारतीय संस्कृती त्यातील विविधता संगीत तसंच चित्रपटांचा प्रभाव आणि त्यांचं जीवंत वैविध्य, कला सादरीकरण आणि संवादात्मक जाणिवांच्या माध्यमातून लोकांशी जोडलं जाण्याची संधी इफिएस्टाच्या आयोजनातून उपलब्ध होत आहे. चित्रपटांसह महोत्सवातील या संधीचा लाभ घेण्यासाठी आजच्या दिवशी नोंदणीत सवलत देण्यात आली आहे. या इफिएस्टामध्ये प्रसारभारतीचं विशेष दालनही असणार आहे.

****

लेखक, कलावंत आणि शिक्षकांनी जातीच्या विचारांपासून दूर राहावं, अशी अपेक्षा नदिष्ट या कादंबरीचे लेखक प्राध्यापक मनोज बोरगावकर यांनी व्यक्त केली आहे. आज बंगळुरू इथं कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेच्या वतीनं डॉक्टर अनुराग लव्हेकर यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. नदिष्ट हे गोदामाईनं माझ्या पदरात टाकलेलं दान आहे, नदी वाहत राहिली तर पुढच्या पिढ्या वाहत राहतील, असं बोरगावकर यांनी नमूद केलं.

****

मतदार जनजागृतीसाठी रत्नागिरीमध्ये मॅरॅथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व नागरिकांनी सदीच्छा दुत म्हणून काम

करावं, असं आवाहन जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी या कार्यक्रमात केलं. यावेळी सहभागी नागरिकांच्या स्वाक्षरी मोहिमेची सुरुवात करून, सर्वांनी मतदान करण्याची शपथ घेतली.

****

आकाशवाणीवरील ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा दैनंदिन कार्यक्रम संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी प्रसारित होतो. यात आज, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील मतदारसंघांचा आढावा एकता येईल.

****

राज्यात काल सर्वात कमी किमान तापमान नाशिक इथं १४ पूर्णांक सात दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. आज सर्वत्र हवामान कोरडं राहील आणि किमान तापमान सरासरीच्या आसपास असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****

क्रीडा जगतात, सध्या भारतीय खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध खेळप्रकारांत घवघवीत यश मिळवत आहेत. इटलीत आयोजित टेबल टेनिसच्या डब्ल्यू.टी.टी. यूथ कंटेंडर या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सिंड्रेला दास हिनं पंधरा वर्षांखालील मुलींच्या एकेरी गटात किताब पटकावला आहे. विशेष म्हणजे अंतिम फेरीत सिंड्रेलानं प्रस्तिस्पर्धी असणाऱ्या भारताच्याच दिव्यांशी भौमिकला पराभूत करुन हे यश मिळवलं.

यासह, ऑस्ट्रेलियातल्या सिडनी इथं आयोजित न्यु साउथ वेल्स स्क्वॅश खुल्या स्पर्धेत अनाहत सिंह हिनं महिला एकेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. तर, भारताच्या पंकज अडवाणीनं कतारच्या दोहा इथं झालेल्या जागतिक बिलियर्ड्स स्पर्धेचं अठ्ठावीसवेळा विजेतेपद पटकावलं.

****

दरम्यान, भारत आणि यजमान दक्षिण अफ्रिकेदरम्यान क्रिकेट टी-ट्वेंटीच्या चार सामन्यांच्या मालिकेचा दुसरा सामना आज खेळवला जाईल.

****